# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय - शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील पारंपारीक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा ४०% ज्यादा विद्यार्थी मागणी प्रस्तावाबाबत.**

दरवर्षी १२ वी परिक्षेच्या निकाल विपुल प्रमाणात लागत असलेमुळे कला, वाणिज्य व विज्ञान (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षाकरीता उपलब्ध विद्यार्थी संख्या विचारात घेता कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेशाबाबत निर्माण झालेली स्थिती विचारात घेवून विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियमामधील कलम ८३ (३) (ग) नुसार विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

i) संबंधित महाविद्यालयाच्या प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरीता सन २०१६-१७ या एकाच वर्षाकरिता महाविद्यालयास शासन मान्य शेवटच्या तुकडीच्या प्रवेश क्षमतेच्या ४०% वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात येईल.

ii) प्रवेश प्रक्रिया राबवताना शासनाच्या आरक्षण धोरणाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

iii) एकाच शहरात/गावात एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर नजिकच्या महाविद्यालयाकडून जादा विद्यार्थी प्रवेश संदर्भात संबंधित महाविद्यालयाने नजिकच्या महाविद्यालयाचे ना-हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.

iv) ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पुरतीच मर्यादीत राहील आणि या पोटी शासन व विद्यापीठ कोणताही आर्थिक भार उचलणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

v) सद्या वाढीव लागणारे निकाल लक्षात घेता महाविद्यालयांनी भविष्यातील विद्यार्थी प्रवेशाबाबतची मागणी विचारात घेवून रितसर प्रस्ताव विद्यापीठास व शासनास सादर करणे आवश्यक आहे. यानुषंगाने जी महाविद्यालये रितसर प्रस्तावान्वये तुकडयांची मागणी करणार नाहीत, अशा महाविद्यालयांना येथून पुढे तात्पुरत्या अतिरिक्त तुकडया देता येणार नाहीत.

vi) ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता प्रथम वर्षाकरिता तात्पुरती अतिरिक्त तुकडीची मान्यता दिली आहे. अशा महाविद्यालयांना त्याच प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता द्वितीय व तृतीय वर्षासाठी तात्पुरत्या अतिरिक्त तुकडीच्या मान्यतेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव सोबतच्या नमुन्याप्रमाणे सादर करावा लागेल.

**टिप :-**

**१) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रू. ७२०/- प्रस्ताव शुल्क स्वतंत्रपणे आकारण्यात येईल, उपरोक्त मुद्दा क्र. ६ नुसार द्वितीय व तृतीय वर्षाकरिता येणा-या तात्पुरत्या अतिरिक्त तुकडीसाठी अनुक्रमे रू. १२००/- शुल्क आकारण्यात येईल.**

**२) ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत शासकीय अनुदान मिळणार नाही, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

**३) वाढीव विद्यार्थी प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह दि. १०.०७.२०१६ पर्यत विद्यापीठास सादर करावेत.**

**४) अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

**५) सोबत प्रस्तावाचा नमुना दिलेला आहे. फक्त त्याच नमुन्यामध्येच प्रस्ताव स्वीकारले जातील.**

**६) ज्या महाविद्यालयांना मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी क्षमता/अतिरिक्त तात्पुरती तुकडी मंजूर केली आहे त्याची प्रत सोबत जोडावी.**

कळावे.

आदेशान्वये

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/** 54
**दि.** 5 JUL 2016
**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये.**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

D:\BSP KOLHAPUR\2016-17\Submission.Docx

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - प्रथम वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

संदर्भ - शिवाजी विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **प्रथम वर्षाकरिता ज्यादा विद्यार्थ्यांची आवश्यकता** आहे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | |
| | **अभ्यासक्रमाचे नाव** | **शासनमान्य मंजूर तुकडी** | | **मंजूर विद्यार्थी संख्या** | | **प्रस्ताव प्रकार** | **भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.)** |
| | | **अनुदानित** | **विनाअनुदानित** | **अनुदानित** | **विनाअनुदानित** | **४०% जादा विद्यार्थी** | |
| | **बी.ए.** | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | |
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** | | | | | | |
| i) | नजिकच्या महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत संबंधित महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. | | | | | | |
| ii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | |
| iii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**प्राचार्य,**
**(सही व शिक्का)**

**टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिताच वापरावयाचा आहे.**

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - द्वितीय वर्षाच्या जादा विद्यार्थी/तात्पुरत्या अतिरिक्त तुकडीच्या मान्यतेबाबत.

संदर्भ - शिवाजी विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये आमच्या महाविद्यालयाना खाली नमूद केलेनुसार प्रथम वर्षाच्या मंजूर शेवटच्या तुकडीच्या ४०% विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ/तात्पुरत्या अतिरिक्त तुकडीस मान्यता मिळाली होती. यानुसार सदरचे विद्यार्थी उत्तीर्ण झालेने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **द्वितीय वर्षाकरिता प्रवेशास पात्र झाले आहेत. सबब, आम्हास ४०% जादा विद्यार्थी/तात्पुरती अतिरिक्त तुकडी मिळणे आवश्यक आहे.**

| **१** | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अभ्यासक्रमाचे नाव** | **अभ्सासक्रमाचे वर्ष** | **शासनमान्य मंजूर तुकडी** | | **मंजूर विद्यार्थी संख्या** | | **प्रस्ताव प्रकार** | | **भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.)** |
| | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | ४०% जादा विद्यार्थी | तात्पुरती अतिरिक्त तुकडी | |
| | **बी.ए.** | | | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | | | |

| | |
|---|---|
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** |
| i) | नजिकच्या महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत संबंधित महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. |
| ii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| iii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| v) | मागील शैक्षणिक वर्षात ४०% वाढीव विद्यार्थी/तात्पुरत्या अतिरिक्त तुकडीच्या मान्यता पत्राची प्रत. |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**प्राचार्य,**
**(सही व शिक्का)**

**टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिता वापरावयाचा आहे.**

D:\BSP KOLHAPUR\2016-17\Submission.Docx